## नियमित दिवाणी दावा क्र. १६६/२०१८ मधील निशाणी क्र. २६ वरील आदेश

( रघुनाथ वि.सोमनाथ व इतर)

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता अज्ञावली ६ नियम १७ सोबत कलम १५१ प्रमाणे प्रस्तुत दाव्यामधील दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०३.** अर्जातील कथनाप्रमाणे वादीने दाव्यामधील नि. १ मध्ये १४ नंबरच्या ओळीमध्ये साठेखत दस्त क्र. १२६१/१९९३ असे चुकून टाईप झाले आहे. परंतु साठेखत करारनाम्याचा दस्त क्र. १२६/१९९३ असा आहे. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही किंवा प्रतिवादीच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करते.

### आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने आज प्रस्तावित दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—

स्थळः— इगतपुरी
( मो. द. ननवरे )

दिनांकः—२०/०१/२०२६
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
इगतपुरी.